# प्रेसनोट दि.- ०८/०८/२०१७

जा.क्र.१६६०/२०१७, स्वारगेट वाहतुक विभाग, पुणे शहर दि - ०८/०८/२०१७

विषय- पुणे शहरात बनावट रिक्षाद्वारे प्रवासी वाहतुक करणा-या रिक्षांवर कारवाई केलेबाबत.

मा. अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर व मा. देविदास पाटील, सहा. पोलीस आयुक्त, परि-२, वाहतुक शाखा, पुणे शहर यांच्या आदेशान्वये पुणे महानगरपालीका परिवहन लिमीटेड पुणे यांचे सोबत अवैध्य प्रवासी वाहतुक करणारी वाहनावर कारवाई करणे साठी कर्तव्य होते दरम्यान पो. निरी .एस. बी पाचोरकर यांचे मार्गदर्शनाखाली गंगाधाम चौक पुणे येथे पीएमपीएल कारवाई दरम्यान सहा. पोलीस निरीक्षक, पी. जी. चोपडे पो.हवा.४९४ भिलारे पो.ना.५९०० जाधव स्वारगेट वाहतुक विभाग व पीएमपीएल चे अधिकारी ,कर्मचारी असे मिळुन पीएमपीएल बसस्टॉप वरील बस व्यातीरीक्त वाहनावर अैवैध्य कारवाई करीत असताना रिक्षा क्र.एम.एच.१२/एफअे/०५९० ही अवैध्य प्रवासी पाहतुक करीत असताना मिळुन आला सदर रिक्षाचालकांना रिक्षाची कागदपत्रे मागितली असता त्याचेकडे रिक्षाची कोणत्याही प्रकारची कागदपत्रे नव्हती व ते कागदपत्रे दाखविण्यास टाळाटाळ करु लागले म्हणून पोलीसांना संशय आला त्यांना एका रिक्षाचा चॅसिस नंबर व इंजिन नंबर चेक केला असता तिचा चॅसिस नंबर व इंजिन नंबर खोडलेला असल्याचे आढळुन आले आहे. सदर रिक्षा क्रमांकांची प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे यांचे कार्यालयात खातरजमा करता एम.एच.१२/एफअे/०५९० हा क्रमांक बसचा असल्याची माहिती प्राप्त झाली.

रिक्षाचालक वसिम नसिम अन्सारी वय ३२ वर्ष रा.व्हीआयटी कॉलेज चौक बिबवेवाडी पुणे यांनी थ्री सीटर रिक्षा कोठुन तरी चोरुन आणुन तिच्यावरील चॅसिस नंबर व इंजिन नंबर खोडून त्यावर खोटा नंबर टाकुन स्वतःचे फायद्याकरीता तो खरा असल्याचे जनतेला व पोलीसांना भासवुन पॅसेंजर वाहतुक करीत असताना मिळुन आले. सदरबाबत मार्केट यार्ड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आले असून पुढिल तपास व.पो.नि. मार्केट यार्ड पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली चालू आहे.